

# गुडघ्याला बाशिंग



## एकांकिका

लेखक

ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

# गुढघ्याला बाशिंग

एकांकिका



लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

# गुडघ्याला बाशिंग एकांकिका

# Gudghyala Bashing / Ekankika

**पहिली आवृत्ती : 3 जून 2024**

लेखक :

ॲड. यशवंत बाबुराव कदम
बी-1101, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई 400 066.
भ्रमणध्वनी : 9892046868/9619360661
**E-mail : ybkadam14@gmail.com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :

**ई साहित्य प्रतिष्ठान**

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

मुखपृष्ठ व अक्षरजुळणी :
राजेश शेलार
राज ग्राफिक्स, चिपळूण 415605.
मोबाईल : 9049982038
मूल्य रु. 160/- (छापिल पुस्तक)

©esahity Pratishthan®2024
ई पुस्तक विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

‘गुडघ्याला बाशिंग” या माझ्या एकांकिमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा...

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# अल्पपरिचय

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

जन्मतारीख : 14 ऑगस्ट 1948

मूळगांव : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

प्राथमिक शिक्षण : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

महाविद्यालयीन शिक्षण : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

नोकरी : आयकर खाते(मुंबई)येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त
सध्या - मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

## खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग

काव्यमंच, मुंबई
कोकण मराठी साहित्य परिषद
मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई
लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

# लेखन (प्रकाशित)

1. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय 1975
2. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह 2008
3. जीवनगाणे (काव्यसंग्रह) 5 जून 2010
4. अंतरंगत (काव्यसंग्रह) 28 फेब्रुवारी 2010
5. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह 2011
6. जय दुर्गे (आरती संग्रह) 2011
7. भक्तिरंग (काव्यसंग्रह) 2012
8. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) 11 जानेवारी 2013
9. तांडव (चरित्र) 11 जानेवारी 2013
10. जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
11. श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, 8 मे 2013
12. बोलके झाड (कथासंग्रह) मार्च 2016
13. महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च 2016

14. दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल 2016)

15. आकाशाचे पंख (कथा संग्रह) 18 फेब्रुवारी 2017

16. अंतरीचा दीप (अभंगगाथा) 12 एप्रिल 2018

17. गडगीचा डोह (कथासंग्रह) 20 मे 2018

18. देव माणूस (व्यक्तिचित्र) मे 2018

19. लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च 2019)

20. हरिपाठ चिंतन (मार्च 2019)

21. वळणावळणाची वाट (कादंबरी) 16 डिसेंबर 2022

22. मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

23. गरुडझेप (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

24. ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

25. लंडनचा किनारा (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

26. आडवळणाची वाट (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

27. चांदण्याचा पाऊस (कथासंग्रह) 1 जानेवारी 2024

28. गोंदण (कथासंग्रह) 7 May 2024

29. गुडघ्याला बाशिंग (एकांकिका) 24 May 2024

आगामी पुस्तके: मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह )
शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
क्षितीजा पलीकडच्या प्रवासात
(मराठी काव्यसंग्रह)
आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ - एक अभ्यास
(ज्ञानदेव आणि तुकाराम)
नक्षत्रांच्या सहवासात (व्यक्तिचित्र)
आठवणींचा पेटारा (चरित्र)
गुडघ्याला बाशिंग (एकांकिका)
हळव्या मनाची पाखरे (कथासंग्रह)

पुरस्कार : 'जीवन गौरव पुरस्कार' - वंदना प्रकाशन
उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.
लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा
पुरस्कार 2018
बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या
नावाचा कथेला तृतीय पुरस्कार 2018
कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या
कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, 2018.

# अर्पणपत्रिका

माझ्या कोकण मराठी साहित्य परिषदेतील उभरत्या साहित्यिक, कवी परिवारातील श्री. सूर्यकांत मालुसरे, सौ नमिता कीर, कमलाकर राऊत, शिवाजीराव गावडे, प्रा. प्रतिभा सराफ, डॉ. सुनील सावंत, सौ. सुवर्णा जाधव, डॉ. दत्ता पवार सर, प्रा. सौ. दीपा ठाणेकर, सौ. अनुराधा नेरुरकर यांना अर्पण करीत आहे.

लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

# माझे दोन शब्द

माझे परममित्र कै. अरुण आठल्ले हे माझ्या कविता, कथा यांचे प्रथम वाचक, समीक्षक आणि रसिक होते.

पु. ल. देशपांडे, सुनीता देशपांडे आणि नाट्यश्रुष्ठी, संगीत श्रुष्ठीशी त्यांचे खूप जवळचे संबंध, गाढे अभ्यासक, तसेच कलक्षेत्राचे ते गाढे अभ्यासक होते. कर्नाटक युनिव्हार्सिटीने त्यांना D.Lit. देऊन सन्मानित केले होते. शिवाय वरदराजन पुरस्कारही दिल होता.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे मधू मंगेश कर्णिक यांच्या बरोबरचे संस्थापक सदस्य. कोमसापच्या अनेक संमेलनाचे आयोजक. चिपळूण येथे कोमसापचे पहिले साहित्य संमेलन त्यांच्यामुळे यशस्वी झाले. त्यानंतर अनेक कार्यक्रम त्यांनी आयोजित केले. देवरुख शिक्षण संस्थेचे संस्थापक होते. उदारमनाचा माणूस म्हणून त्यांचा उल्लेख करायला हवा. केशवसुत स्मारकाचे ते शिल्पकार होते. साहित्य आणि संगीत नाट्य यांचे ते रसिक व्यासंगी होते. आमचे म्हणजे यांच्या पिढीचे ते स्फूर्तिदाते होते.

अरुणभाऊ एकदा मला म्हणाले होते, "यशवंतराव मला तुमच्याकडून एका संगीत नाटकाची अपेक्षा आहे पण त्यासाठी अजून पर्यन्त योग्य ज्वलंत विषय मला सापडला नाही माझ्या नोकरीच्या धिबिडक्यात, पण छोट्या छोट्या नाटिका, एकांकिकांचे लेखन झाले पण तेही अडगळीतच पडून राहिले एवढे

मात्र खरे. तेव्हा माझी पोस्टिंग चर्नी रोडच्या ऑफिसमध्ये होती. नव्यानेच मी तेथे आलो होतो. त्या इमारती खाली हॉस्पिटल, वर आमचे ऑफिस, जवळ गिरगाव चौपाटी आणि ऑफिसच्या बाजूला महिलांचे एक हॉस्टेल होते. शाळा कॉलेजात शिकणाऱ्या नोकरी करणाऱ्या मुली तेथे राहत. चर्नी रोड स्टेशन वरून ऑफिसला येताना त्या मुली दिसायच्या. त्यांचे वागणे, बोलणे बरेच काही माझ्या कानावर पडायचे. सकाळी नऊ साडेनऊ वाजता जेव्हा त्या कॉलेजला जायच्या त्यातच या एकांकिकाचे सूत्र मला सापडले.  1989 साली ही गुडघ्याला बाशिंग ही एकांकिका लिहिली. पण ती अशीच पडून राहिली गेली 34 वर्षे.

मी मुंबईहून गावाला राहण्याचे ठरवले. आणि जुने पाने, कागद, कवितांच्या सगळ्या वह्या, गावाला आणल्या त्यात या एकांकिकाचे स्क्रिप्ट होते. आमच्या शेजारी अशी एक घटना घडली पंधरा दिवसांपूर्वी. मी त्यावर विचार करताना मला आठवले अशी एक नाटिका (एकांकिका) मी लिहिली होती. म्हणून मुंबईवरून आणलेल्या वह्या पेपर्स या शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा हे स्क्रिप्ट सापडले. मी वाचून पाहिले आवडले आणि म्हणून त्याचे ई बुक करावे असा माझा मानस होता.

मी याबाबत माझे मित्र साहित्य प्रतिष्ठानचे श्री. सामंत यांना बोललो ते म्हणाले डीटीपी करा. आणि मला पाठवा त्यामुळे या एकांकिकेला मार्गी लावले. माझे मित्र राज यांनी त्याचे डीटीपी केले. छान मुखपृष्ठ चित्तारले.

हा विषय असा आहे की पैशाच्या लालसेने लग्न जमवणाऱ्या संस्थांचे पेव तेव्हा फुटले होते. आता तर तो नवाच फंडा झाला आहे. मला आठवते

एखादे स्थळ शोधण्यासाठी विवाह संस्थेच्या कार्यालयात जावे लागे. पण आता सगळेच नेटवर हँडी झाले आहे. लग्न जमतात, नाही असे नाही, पण यातून अनेक गैरप्रकारही अनेक घडत असावेत. पण समोर येऊ न सारेच 'तेरी भी चूप' असाच मामला असतो. आपल्या इज्जतीला, म्हणजे आताच्या इमेज ला सगळे जगतात आणि प्रकरण गाडली जातात! तर काही धैर्यांने वाचा फोडतात. आणि गैरप्रकार बाहेर येतात, इतरांना सावध करतात, तर काही कच खाऊन गप्प बसतात.

खरे तर आताची नवी पिढी ही शिक्षित आहे, कमावती आहे. आई वडिलांच्या पश्चात ती काय काय करीत असतील माहित नाही, त्यात थोडेच किनाऱ्यावर लागतात. तर बरेच गटांगळ्या खात आयुष्याचे मातेरे करतात. खरे तर त्यांना सावध करावे. आंतरधर्मीय विवाहांना आळा बसावा. समाजाचा वचक राहावा यासाठी समाजातील मुला मुलींनी पालकांनी समजातीलच स्थळे शोधावीत असे मला वाटते. म्हणून हा विचार या नाटकाच्या माध्यमातून शाळा कॉलेजात शिकणाऱ्या मुलांना सावध करावे यासाठी लिहिला. तोच उद्देश या मागे होता. यातून मुले मुली सावध झाल्यावर गैरप्रकार थांबले तर हे पुण्य कर्मच म्हणावे लागेल.

या एकांकिकेत त्या मुली या हॉस्टेलमध्ये राहतात. वयात आलेल्या असतात. विवाह संस्था आपल्या संस्थेच्या माध्यमातून विवाहासाठी अनेक स्थळांचे प्रस्ताव जाहिरात म्हणून देतात. या त्यांच्या लेखी तो एक धंदा असतो. पण अनेक मुले मुले भोळसरपणे यातच शिकार बनतात. त्यातून काही सावध पाऊले उचलल्याने शिकार होत नाहीत तर काही अगदी मुळापासून उखडून

रस्त्यावर येतात. अनेक मुली आपले शारीरिक पावित्र्य गमावून बसतात आणि आयुष्यभर स्वतःला दोष देत कसेतरी आयुष्य जगतात. शिक्षणाचा बोज बारा वाजतो यात विवाह संस्थांनी सावधपणे संस्थान कडे येणाऱ्या स्थळांची छाननी करायला हवी. पण असे होत नाही. त्यांचे पत्ते, राहण्याची ठिकाणे यांची खरी माहिती घ्यायला हवी, पण त्यांच्या बेदरकारपणामुळे असे होत नाही आणि चुकीच्या स्थळांनी अनेक जणांची फसगत होते. म्हणून सावधानतेचा इशारा घ्यावा यासाठी हा नाट्य लेखनाचा प्रपंच.

या नाटकातील सर्व पात्रे या मुली आहेत. ज्या लेडीज हॉस्टेल मध्ये राहून विद्यार्जन करीत आहेत. स्त्रियांनी त्यांच्या विवाह योग्य वयात लग्ना संबंधीच्या भवन जागृत होतात. आणि जेव्हा whatsapp, mail च्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचतात त्या स्त्रिया आपसा आपसंतील संपर्काने सर्वांपर्यंत पोहोचवतात. या नाटकात हेच झाले. त्यांच्या हॉस्टेलच्या इमारतीवरील एका हँडबिलामुळे. हां वैचारिक संघर्ष आहे. त्यातून चांगल्या वाईट गोष्टी घडतात. विवाह जमवणाऱ्या संस्थांचे जे पेव आज फुटले आहे. यात सावधानता दिसत नाही. फक्त पैसा कमावणे हेच त्यांचे ध्येय आहे. त्यातून या चक्रव्युहात अनेक मुले मुली फसतात. समाजाने सावध होऊन हे दुष्परिणाम होणार नाहीत यासाठी सतर्क राहायला हवे. या वृत्ती विरुद्ध संघर्ष करणे गरजेचे आहे. यासाठी हा नाटक प्रपंच.

या एकांकिकाचे डीटीपी राज यांनी केले आहे. माझ्या कोमसापतील सहाध्यायी सौ. अनुराधा नेरूरकर यांनी या पुस्तकाला प्रस्तावना दिली आहे. त्या रत्नागिरीत एक वृत्तपत्र चालवतात व त्यात स्त्रियांसाठीचे एक सदर

लिहितात. त्यांना मी विनंती केल्याने त्यांनी या एकांकिकेला प्रस्तावना लिहून देण्याचे कबूल केले व ते काम अगदी कमी वेळात पूर्ण करून दिले. मी त्या सर्वांचा आभारी आहे. त्या एक उत्तम लेखिका आहेत अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

ही नाटिका (एकांकिका) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लिहिली आहे. ती स्पर्धेसाठी वापरावी व यातील विषयाने समाजामध्ये एक उदात्त संदेश जावा ही अपेक्षा.

धन्यवाद!.

**- ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# प्रस्तावना

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या परिवारातील ज्येष्ठ लेखक श्री. यशवंत कदम यांनी प्रस्तावना लिहण्यासाठी त्यांचं नाट्यलेखनाचं स्क्रिप्ट माझ्या हातात ठेवलं तेव्हा एक सुखद धक्का बसला. कथात्मक साहित्यात इतकी वर्षे रमणारा हा लेखक उशीरा का होईना पण नाट्यलेखनाकडे वळला याचा आनंदही झाला. आजवर कथा, कविता, चरित्र, अभंग, संतसाहित्यावरील वैचारिक लेखन अशी जवळजवळ तीसहून अधिक पुस्तके त्यांची प्रकाशित झालेली आहेत. जबाबदारीची नोकरी सांभाळून त्यांनी आपला हात अखंड लिहिता ठेवला हे विशेष.

“गुढघ्याला बाशिंग ” हे अवघ्या पस्तीस पृष्ठांचे नाटक. लग्न-विवाह या विषयाभोवती या नाटकाचं कथानक फिरत राहातं. वसतीगृहात राहणाऱ्या यामिनी - रश्मी - रेवती - कुंदन - शुभांगी या पाच तरूण अविवाहित मुलींच्या संवादातून या विषयातील नाट्य उलगडत जातं. खरंतर लग्न /विवाह हे सामाजिक बंधन आहे. कुटूंबव्यवस्था, समाजव्यवस्था याचा तोल सांभाळणारी ती एक कायदेशीर पध्दत आहे. मात्र लग्न जुळणं ही गोष्ट पूर्वीइतकी सहजसाध्य आणि निर्दोष आज राहिलेली नाही. माणसाच्या एकूणच जगण्यात आलेली गतीमानता, यांत्रिकीकरण, फ्लॅट संस्कृती यामुळे माणूस परस्परांपासून काहीसा तुटत चाललाय. एकमेकांविषयी वाटणारे ममत्व, जिव्हाळा, आपलेपणा हे कुठेतरी हरवून गेल्यासारखं झालंय. परस्परसंवादही कमी झाल्यामुळे नात्यांची वीणही घट्ट राहिलेली नाही. अशा परिस्थितीत लग्न जमणे आणि ते टिकवणे ही तारेवरची कसरत झालीय.

पूर्वीच्या काळी मुलामुलींचे लग्न ठरविण्यासाठी घरातील वडिलधारी - कर्त्या व्यक्ती, जवळचे नातलग, आप्तमंडळी पुढाकार घ्यायचे. आता काळ बदलला. तरूण मुलं मुली शिक्षण घेतात, आर्थिकदृष्टया सक्षम होतात. आजच्या संगणक आणि मोबाईल युगात करिअरचा विचार करून, उत्पन्नाचा, शिक्षणाचा, दिसण्याचाही विचार करून स्वत:च्या लग्नाचा निर्णय स्वतः घेताना दिसतात. मात्र या सर्व गोष्टी जुळून येताना मुलांमुलीचं वय वाढत जातं. आपलं लग्न होईल का नाही हा प्रश्न त्यांना भेडसावायला लागतो. त्यांना मदत करायला अनेक विवाह मंडळे, वधूवरसूचक मंडळे त्यासाठी सज्ज झाली आहेत. तिथे लग्न जमतातही पण तिथली माहिती अनेकदा विश्वासार्ह नसते, अनेक गैरव्यवहार तिथेही होताना दिसतात, पण हा विषयच इतका नाजूक व खाजगी आहे की त्याची जाहीर वाच्यता फार कमी होते.

या सगळ्या पार्श्वभूमीवरील 'गुढघ्याला बाशिंग' हे नाटक आहे. वसतीगृहातील मुलींना, रेश्माला वसतीगृहाच्या हॅण्डबीलावर विवाह मंडळाकडून आलेल्या एका स्थळाची जाहिरात दिसते. शिक्षण - पैसा दिसणं या साऱ्याच बाबतीत वरचढ असलेल्या त्या स्थळाकडे ती आकर्षित होते. मैत्रिणींना ती जाहिरात दाखवते. प्रत्येकीलाच तो आपल्या स्वप्नातला राजकुमार वाटतो. एकमेकींना जराही कळू न देता स्वतंत्रपणे त्या जाहिरातीला संकेतस्थळावरून होकार देतात. प्रत्येकीला ‘बघण्याच्या” कार्यक्रमाला संकेतस्थळाची संचालिका बोलावते. तिथे एकत्रिकपणे सगळ्या आल्यावर त्यांचं बिंग फुटतं, शिवाय तो "हॅण्डसम" न आल्याने सगळ्याजणींची निराशा व फजिती होते. व त्यादिवशी असणाऱ्या परिक्षेच्या पेपरला दांडी मारल्याने त्यांचे वर्षही वाया जात. एकंदरीत "गुढघ्याला बाशिंग ” सर्वार्थाने खरं होतं.

यशवंत कदमांनी समस्याप्रधान विषयाची निवड केली असली तरी त्याला गंभीर वळण न देता हलक्या फुलक्या, सहज भाषेत विषयाची नीटपणे मांडणी केली आहे. प्रत्येक तरूण मुलीला विवाहाविषयी आकर्षण-ओढ वाटणं स्वाभाविक असलं तरी उतावळेपणा न करता, अवाजवी अपेक्षा न ठेवता, समंजसपणे आपल्याला अनुरूप असा जोडीदार निवडला पाहिजे असा आशय त्यांनी सहजपणे वाचकाच्या गळी उतरवला आहे.

विवाहमंडळांची पारखही डोळसपणे केली पाहिजे, आणि जिथे कुठे चुकीच्या गोष्टी घडत असतील त्याला आळा बसण्यासाठी पुढे आलं पाहिजे हे सत्यही जाताजाता ते सांगून गेले आहेत.

नाटकात धक्कातंत्राचा अवलंब केला जातो. या नाटकातही रेवती हे पात्र आहे. तिच लग्न तिनेच ठरवलं आहे आणि विश्वासाने, मुक्तपणे ती तिच्या प्रियकराबरोबर बिनधास्त वावरते आहे. शेवटी तिच्या असमंजसपणाने तिची फसगत होताना दिसते.

नाटकात नाट्य असावं लागतं. त्याला विशिष्ठ लय लागते. वैशिष्ठपूर्ण घटनांतून, संवादातून कथानक पुढे पुढे सरकणे अपेक्षित असते. त्यातूनच व्यक्तिरेखा उभ्या राहत असतात त्या सगळ्या तांत्रिक बाजू सांभाळण्यात लेखक यशवंत कदम बऱ्यापैकी यशस्वी झाले आहेत. समाजातील लग्न व्यवस्था या विषयावर हे नाटक लिहलेले आहे त्याचे सादरीकरणही रंगमंचावर झाले तर हा विषय अधिक गांभीर्याने व प्रभावीपणाने लोकांपर्यंत पोहचेल असा मला विश्वास वाटतो.

\- नमिता रमेश कीर

# गुडघ्याला बाशिंग

*(होस्टेलमधले प्रत्येक मुलीला एक रूम अलोट केले आहेत. यामिनीच्या रूममध्ये रश्मी येथे तेथेच संपूर्ण नाटकाची घटना घडते.)*

रश्मी : यामिनी! अगं ये यामिनी, दार उघड! मला काही सांगायचे आहे!

*(असा बाहेर आवाज येतो. यामिनी उठून दार उघडते. रश्मी आत येते)*

यामिनी : ए! काय ग एवढ्या घाईत का आज? काय झाले? बोल!

रश्मी : काही नाही ग! पण सहजच.

यामिनी : पण काय?

रश्मी : सहज! तुला एक सांगायचे होते!

यामिनी : अगं पण काय? आणि एवढी घाबऱ्या घुबऱ्या?

रश्मी : हो! ही ही ॲड बघ! आपल्या हॉस्टेलच्या गेटवर लावली आहे; ती तू वाचली असशीलच. त्याच्या मेलवर मी मेल करून माझी सगळी माहिती दिली आहे. त्यांच्या मेलने त्या स्थळाची माहिती आली बघ. काय सुंदर स्थळ आहे ग हे! मालदार पार्टी आहे! कोण्या बड्या घरचा राजकुमार असावा! बघ तर खरं!

यामिनी : अगं पण कशाबद्दल बोलतेस हे सारे!

रश्मी : स्थळाबद्दल! लग्नासाठी!

यामिनी : आणि कुणाच्या?

रश्मी : माझ्या!

यामिनी : Oh काय वेड बीड लागले नाही ना?

रश्मी : वेडच लागले आहे! अगं मी पार बेचैन झाली आहे! नवरा असावा तर असा! गाडी, बंगला, उत्तम मिळकत, श्रीमंत! अहाहा!! *(स्वतःभोवती गिरक्या घेत)*

यामिनी : अगं काय स्वप्नात तर बडबडत नाहीस ना?

रश्मी : नाही! ही पहा! *(तिच्या मोबाईल वर आलेले मेल तिला दाखवते. पण यामिनी ती नाही पहात.)* आज कसे अगदी धुंद झाल्यासारखे वाटतेय!

यामिनी : अगं पण एवढा बेचैन होण्यासारखं काय आहे यात! सांग!!

रश्मी : काही नाही ग! तसे काही नाही! पण!

यामिनी : पण काय? स्पष्ट बोल ना!

रश्मी : हा मेल बघ! यात लिहिलंय! *(वाचते त्यावेळी यामिनी शांतपणे आपल्या कोचावर बसलेली असते . तिच्यावर याचा काहीही परिणाम होत नाही)* वधु पाहिजे, 21, 154, सडपातळ, पदवीपर्यंत शिकलेली, देखणी, उपवर! प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची! मनमिळावू, प्रपंच दक्ष, स्वतंत्रपणे घर सांभाळणारी!

यामिनी : अच्छा! म्हणजे सुंदर ग्रहदक्ष मोलकरीणच हवी आहे म्हणा ना!

रश्मी : आणि हे पुढे वाच! वर -: 26, सधन, उत्तम आर्थिक स्थिती, वार्षिक उत्पन्न पन्नास लाख रुपये! *(यावर जोर देत)* कृपया संपर्क साधा फोन नं. 420024. आहे की नाही! तूच सांग? अगं शेवटी लिहिलंय पसंत

पडल्यास मेलने कळवले जाईल, फोटो जरूर पाठवा. काय करू काहीच समजत नाही! बोल!

यामिनी : झाले तुझे!

रश्मी : हो

यामिनी : या अशा प्रकारच्या मेलच्या आणि स्थळांच्या चक्कर मध्ये पडू नकोस. कृपा करून यांच्यापासून दूर राहा! अगं ज्यांच्यात काही खोट आहे असेच लोक या ॲड देतात. कोण विश्वास ठेवणार यांच्यावर? आणि परीक्षा पंधरा दिवसांवर आली आहे! अभ्यास करायचा सोडून काय डोक्यात हे फॅड भरून घेतले आहेस. तुझे बरे! मला जरा स्वस्थ पडू दे! माझा आज मूड ठीक नाही!

रश्मी : काय झालं तुझा मूड बिघडायला? की माझ्यासारखीच अवस्था झाली आहे, नाही ना?

यामिनी : नाही गं बाई! तसे काही नाही!

रश्मी : तरीपण, तुझा चेहरा असा पडलेला का?

यामिनी : अगं पण तू आज माझ्या खनपट्टीला का बसलीस? जा अभ्यास कर! मला काही सांगायचे नाही!

रश्मी : प्लीज यामिनी! माझं ऐक ग! *(काकुळतीला येऊन)*

यामिनी : काय? बोल!

रश्मी : तसे नाही ग! पण उद्या परीक्षा संपल्यावर लग्नाचा ससेमीरा मागे लागणारच ना? आज आपण स्वतंत्र आहोत! उद्या परीक्षा संपल्यावर

हे हॉस्टेल सोडावे लागेल. घरी गेल्यावर आपल्याला काही स्वातंत्र्य मिळणार नाही. अगं माझी तर मोठी पंचायतच होणार आहे! आमचे घराणे जुन्या वळणाचे आहे. समाज पण फार सुधारलेला नाही! चांगली शिकलेली स्थळ आज मिळणे फार दुरापास्त झालेय! मिळेल त्याच्या पुढे उभे राहून गळयात बांधून घ्यावी लागेल धोंड! अगं कसायापुढे बकरी सारखी माझी अवस्था होईल! मग बसावे लागेल आयुष्यभर रडत! *(रश्मी यामिनीचा हात हातात घेऊन तिला लडिवाळपणे सांगते)*

यामिनी : मग काय म्हणणे आहे तुझे?

रश्मी : मला वाटतं याच स्थळासाठी मी पत्रव्यवहार करावा! खडा टाकून तर पाहूया! पसंत आले तर ठीक, नाहीतर नंतर वाटायला नको आपण काही हात पाय हलवले नाहीत म्हणून! नाहीतर माझ्यासाठी कोण राजकुमार आपल्या पायाने चालत यायला!

यामिनी : तेही खरेच! पण रश्मी! मला हे काहीही पसंत नाही. आपण ह्या अशा सामान्य! दिसायलाही यथातथाच! कशाला या भानगडीत पडा? उगाच ना पसंतीचा नाट लागायला नको! काय? बरोबर की नाही!

रश्मी : अगं मी माझ्याबद्दल म्हणते! तुझ्याबद्दल नाही!

यामिनी : अगं मी तर माझा विचार कधी केलाच नाही! तू! ह्या ह्या अप्सरेबद्दल म्हणतेय मी! *(तिला रश्मीला दाखवीत)*

रश्मी : इश्य! अप्सरा!! ही माझी 55।55।50 ची अंगयष्टी

यामिनी : म्हणूनच मी म्हणतेय! तू त्या ॲडला सूट आहेस काय? त्यांना 36-24-36 हविय! *(दाखवित)* कडेवर फिरवशील त्याला! आणि तुझा हा फुटबॉल पसंत पडेल कां त्यांना? मला तर बाई शंकाच वाटतेय!

रश्मी : अगं मॅरेजेस् आर सेटल इन हेवन! अगं पण शोधाशोध नको का करायला? शोधा म्हणजे सापडेल! म्हणून मी म्हणाले. प्रयत्न का करू नये? आणि काय ग? माझ्यात काय कमी आहे? मी सुदृढ तर आहे की नाही? अगदी बेढब तर नाही ना? स्थूलपणाच बघता येईल ग! नाहीतरी ते नक्कीच दिलदार असणार! मला खात्री वाटतेय गं! मी त्यांना नक्कीच पसंत पडेन! बघुया!

यामिनी : अगं! घरचे लोक पण प्रयत्न करतायत ना?

रश्मी : हो! करतायेत! आज तीन वर्षे वर पक्षाचे उंबरे झिजवता झिजवता जोडे फाटले माझ्या वडिलांचे! काही जमत नाही! किती म्हणून त्यांनी प्रयत्न करावे! काहीं ना काही कारणावरून लग्न मोडतात! अगदी जमत आलेली!! कधी हुंड्यावरून तेढा! तर कधी पत्रिका जमत नाही! कधी मंगळ उभा तर कधी शनि आडवा! कधी मला ते नापसंत तर कधी मी त्यांना नापसंत! रिझल्ट काय? ही अशी जीवाची तगमग होतेय! यात काही खरे नाही!

यामिनी : अगं पण तुझे वय गेले नाही अजून! आता कुठे तुला विसावे लागलेय! हा! आता तुझा हा आकार पाहून तू मोठी दिसतेय वयापेक्षा एवढेच! *(तसे दाखवते)* अगं पण माझे मेलीचे बघ ना! माझी ही तब्बेत काय? ही अशी *(दाखवते)* ही हाडाचे काडे! लग्नाच्या बाजारात माझा

भाव काय? झीरो! *(मोठे वर्तुळ करून दाखवते)* तुझ लग्न जमेल ग! धीर सोडू नकोस! पण पण रश्मी माझे गं! *(तिला हुंदका फुटतो.)*

रश्मी : अगं! अगं! यामिनी! *(तिला सावरते)* एवढ कसल मनाला लावून घ्यायचे! असे काय एवढे झालेय? बोल तरी?

यमिनी : काही नाही! काही नाही ग!

रश्मी : काही नाही कसे! अगं तुझा हा चेहराच सांगतोय! बोल *(यामिनीला अधिकच भडभाडून येते. तिला रश्मी सावरते)*

यामिनी : काही नाही ग! काय सांगणार? थांब जरा वॉश घेऊन येते! (वॉश घेण्यास जाते) एवढ्यात यामिनीच्या टेबलावर पत्र सापडते ते ती वाचते) रश्मी पत्र वाचते तिचा चेहरा खुलतो व उठून यामिनी तिला हाक मारते!

रश्मी : अगं यामिनी! किती ग तू लबाड! काँग्रॅच्युलेशन! यामिनी! काँग्रॅच्युलेशन!! *(यामिनी गप्प रहाते. हात पुसत बाहेर येते)* किती नशीबवान बाई! तू! अगं! तुझे लग्न ठरलेय, आणि बोललीस पण नाही? अगं मला, तुझ्या प्रिय मैत्रिणीला काही सांगितले नाहीस! कमाल आहे हां तुझी!

यामिनी : काय कमाल आहे? आणि काय सांगितले नाही? सांगण्यासारखे आहेच काय त्यात? वाचून पहा जरा पुढे पण! *(पुढे पत्र वाचून पहाते तिचा गळा दाटून येतो. पण ती काही बोलत नाही.)* बोल काय वाचलस?

रश्मी : काय सांगू *(परत गप्प बसते)*

यामिनी : काय सांगण्यासारखे आहे यात! म्हणे काँग्रॅच्युलेशन! गुड न्यूज! काय पण गुड न्यूज! पुढे काय वाढून ठेवलंय परमेश्वरच जाणे! वडिलांनी माझं लग्न चक्क बिजवराशी ठरवलेय! त्यांची बायको म्हणून नव्हे, तर चक्क मोलकरीण म्हणून राहावे लागेल. आणि त्यांच्या पोरांच्या लोंबारात गाडली जाईन मी. हे सारे हुंड्या पायी!!

रश्मी : अगं बाई! आणि एवढे सारे होऊनही तू शांतच. मी तर एवढ्यात प्राण सोडला असता!

यामिनी : मग काय करावं अशी तुझी अपेक्षा आहे? हसावे की रडावे!

रश्मी : ते दिसतेच आहे!

यामिनी : अगं तू गुडघ्याला बाशिंग बांधून निघाली आहेस लग्न करायला! तुझ्यासारखा मला कसं जमेल करून. काय गं? प्राण सोडायच्या गोष्टी तू मला सांगाव्यास! "कसा पण चालेल पण नवरा हवा!" ह्या तुझ्या घोषवाक्याचा अर्थ काय मग?

रश्मी : अगं मी तुझ्या ठिकाणी असते तर पळून गेली असती कोणाचा तरी हात धरून!

यामिनी : हे खरं! पण तो हात तरी मिळायला हवा ना?

रश्मी : तेही खरेच! कशी गं मी वेडी?

यामिनी : त्याला फार मोठे धाडस लागते! काय तुझे थोबाड पळून जाणारनीचे! आणि अशाने का लग्नाचे प्रश्न सुटतात! घोडा मैदान लांब नाही.

रश्मी : आहे की! बघच तू! तू मला चिडवू नकोस, बघतेच मी काय करते ते!

यामिनी : मोठी शेरनी लागून गेलीस! म्हणे पळून जाणार! जाऊन दाखवच! अगं नाव काढलं पुरुषाचं तरी गाळण उडते तुझी. आली म्हणे...

रश्मी : तू मला अजून पुरती ओळखली नाहीस! बरं ते जाऊ दे! अगं ये यामिनी, *(यामिनी गप्प असते)* मी काय करू? *(दोन्ही खांदे हलवून)* मग मी म्हणते, मेल पाठवून वाट बघतेच!

यामिनी : बघ ना बापडी! मी काय सांगू! आणि मी नाही म्हणाले म्हणून तू थोडीच ऐकणार आहेस?

रश्मी : तेही खरेच! काय ग यामिनी तुला काय वाटतं या स्थळाबद्दल?

यामिनी : मला काय वाटणार? *(चेहरा निर्विकार पण आज घालमेल झाली आहे पण नकारात्मक अविर्भाव)*

रश्मी : काहीच वाटत नाही?

यामिनी : नाही! नाही! *(रश्मीचा चेहरा पडतो. अपराध्यासारखं वाटतं)*

रश्मी : अगं असं उत्तम स्थळ तुला मिळालं तर नको आहे का?

यामिनी : मी काय बोलणार! आणि वाटून काय उपयोग? मी ही अशी!!

रश्मी : माझा तर बाई पक्का विचार ठरलाय, माझा बायोडाटा मी पाठवूनच देते! बघूया!! सोबत फोटोही पाठवते. *(खुशीत उठते जायला)* प्रयत्नांती परमेश्वर!

यामिनी : परमेश्वर नाही! पती परमेश्वर!! *(दोघीही हसतात)*

रश्मी : हा! हा! त्यांच्या शोधासाठी हा प्रयत्न *(शब्दांवर जोर देत)*

यामिनी : करा प्रयत्न करा!

एवढ्यात दारावर टकटक होते *(बेल वाजते)*

यामिनी : कोण आहे ग!

रेवती : अगं मी रेवती!

यामिनी : ये! आत ये! दार उघडेच आहे!!

रेवती : काय ग रश्मी! तुला केव्हाची मी शोधतेय! संपूर्ण मजला पालथा घातला, आणि तू इथे! काय ग? काय एवढ्या गहन विषयावर चर्चा चालली आहे?

रश्मी : काही नाही ग! अशाच गप्पा मारत बसलोय! पण तुझं काय एवढं काम आहे तातडीचं?

रेवती : अगं ते हे! ते!! *(लाजत)*

रश्मी : काय हे! ते!! स्पष्ट बोल!

रेवती : हे! माझे यजमान खाली आहेत.

रश्मी : यजमान!! *(दोघी हवेत उडतात अशा अविर्भावात बोलतात)*

यामिनी : काय ग लग्न केलस की काय?

रेवती : नाही! होणार आहे! आम्ही दोन दिवस बाहेर जाणार आहोत महाबळेश्वरला! तेव्हा येणार नाही म्हणून सांगायला आले!

रश्मी : काय ग लग्न कधी करताय?

रेवती : एवढ्यात नाही! तयारी चालली आहे! लवकरच निर्णय घेऊ.

रश्मी : तुझे बरं बाई! छान जमवलस ग! कसं काय ग?

रेवती : बस स्टॉप वर!

रश्मी : बस स्टॉप वर!! कामालच आहे ह! बाकी वाटले नव्हते एवढे धाडस करशील असे! आणि कधी बोलली नाहीस ती माझ्याजवळ?

रेवती : त्यात काय सांगायचे! त्याला वर्ष झाले! अगं लग्न करून इथे हॉस्टेलवर राहता आलं नसतं! आणि यांची स्वतःची जागा पण नाही. व्यवस्था होईल तेव्हा ना!

रश्मी : मग आता काय करणार? म्हणजे राहणार कुठे?

रेवती : काहीतरी व्यवस्था करतो म्हणाले! अगं खरं तर मीच मागे लागले म्हणून यांनी हा निर्णय घेतला, नाही तर कसले घेतात हे! पण एकदाचे तयार झाले?

यामिनी : आणि महाबळेश्वरला कशाला जाणार आहात ग?

रेवती : सहज फिरायला ग! तसं काही नाही! *(डोळे रोखून पहात)*

यामिनी : अगं पण आमच्यापासून हे सारे लपून कसे ठेवलेस?

रेवती : आमचे ते सिक्रेट होते अगदी लग्नापर्यंत कोणाला काही सांगायचे नव्हते आम्हाला, पण आता सारी तयारी झाली आहे तेव्हा म्हटले

सांगावे! अगदी दागिने, कपडे पण घेऊन झाले! हा सारा खर्च माझा ह!

रश्मी : काय पण सिक्रेट! बरीच लबाड आहेस ग! काय पण शक्कल लढवलीस! याला म्हणतात डोकं, नाही तर ह्या आम्ही, आमच्या जीवनात काही थ्रीलच नाही मुळी!

यामिनी : अगं रश्मी त्याचे काय आहे आपण पडलो भिडस्त वळणाच्या ना? त्यामुळे!

रेवती : अगं ये रश्मी, यामिनी! हे बघा मला निघायचं आहे आता

रश्मी : निघशील ग, एवढी काय घाई लागलीय? अगं ये यामिनी म्हणून मी म्हणते आपण सहज प्रयत्न करून बघूयाच! पाहूया काय होते ते? खडा टाकून तर पाहूया, तरला तर तरला नाहीतर बुडला! कसे!

रेवती : काय ग कुठे खडे मारणार आहात?

रश्मी : ते आमचे सिक्रेट आहे!

रेवती : असू दे तुमचे सिक्रेट! छान! माझ्यासारखे नाही ना?

यामिनी : नाही ग, तसं काही नाही!

रेवती : अच्छा येते मी!

रश्मी : बेस्ट ऑफ लक. बाय बाय! *(रेवती जाते)*

यामिनी! मी पण येते ग! वेळ झालाय! कॉलेजला जायचं आहे! काहीतरी इम्पॉर्टंट देणार आहेत. शिवाय टाईम टेबल घ्यायचे आहे! येणार ना?

यामिनी : नाही ग! आज माझी तब्येत ठीक नाही आणि मूडही नाही! मी आज चक्क आराम करायचा ठरवलेय! तु जा!

रश्मी : ठीक आहे! येते मी! अगं पण त्या मेलचे काय?

यामिनी : सारखं सारखं काय विचारतेस! दे पाठवून! जा.

रश्मी : थँक्स फॉर सपोर्ट! *(रश्मी निघते)*

यामिनी : सपोर्ट कसला ग! *(तिच्या खांद्यावर हात ठेवून)*

रश्मी : काही नाही! येते मग! *(जाते) (जाताना ॲडचा पेपर विसरून जाते)*

यामिनी : *(स्वगत)* काय करावे काही सुचत नाही! घरच्या मंडळींनी तर मला अडचणीत आणलेय! माझ्या आयुष्याचा त्यांनी कधीच काही विचार केला नाही मला विचारायला तरी हवे होते माझी पसंती नापसंती तरी पाहायला हवी होती! माझ्या नकळत सारे निर्णय घेऊन कसे हे मोकळे झाले? हाय देवा! पुढे काय लिहिले माझ्या जीवनात? हा सारा गरिबीचा खेळ आहे. हुंडा देता येत नाही म्हणून चांगली स्थळ मोडली आणि हे असं पडेल स्थळ माझ्यासाठी स्वीकारायला सारे कसे तयार झाले? *(थोडा वेळ थांबते)* त्यात ह्या रश्मीने माझ्या मनात आता मोठा गोंधळ उडवून दिलाय! To be or not to be! काय करावं काहीच कळत नाही! माझ्यात काय कमी आहे, मी सुंदर आहे! मी का म्हणून

गप्प बसावे? रश्मी सारखे मी प्रयत्न केला तर? *(एवढ्यात तिचे लक्ष तिच्या कॉटवर पडलेल्या ऍडच्या पेपरवर जाते व ती तो घेऊन पूर्ण वाचते त्याची कॉपी करते)* ठरलं! आपण पण पत्र पाठवायचं! मी का म्हणून मागे राहावं!

*(एवढ्यात टकटक असा आवाज येतो.)* अगं ए यामिनी जरा दार उघड) मी रश्मी आहे! *(असा आवाज येतो.)*

यामिनी : हा! थांब ग! उघडते! *(दार उघडते.)* काय ग?

रश्मी : अगं माझे ते तुला दाखविलेले वर्तमानपत्र ग! ते इथेच राहून गेले!

यामिनी : हा! हे घे! *(तीला देते)* यामिनी तिच्याकडे पहात राहते काहीच बोलत नाही. *(दार बंद करून घेते.)*

*(भराभर पेनाने पत्र लिहीत आहे) (स्वगत) मला खात्री आहे! मी त्यांना नक्की पसंत पडेन, रश्मी पेक्षा तर मी खात्रीने सरसच आहे आणि दिसायलाही नक्कीच उजवी आहे. मग का जावे मी बळी म्हणून त्या म्हाताऱ्याच्या हातात? त्यापेक्षा हे स्थळ हजार पटीने सरस आहे. (भराभर सारी कामे करते फोटो इतर पेपर जमा करून ती एका लिफाफ्यात भरते व बाहेर जायची तयारी करते)*

*(एवढ्यात दरवाजावर टकटक होते -रश्मी येते.)*

रश्मी : अगं! यामिनी! जरा दार उघड! येतेस की नाही कॉलेजला?

यामिनी : *(दार उघडते)* नाही ग! माझी आज तब्येत ठीक नाही तू जा!

रश्मी : अगं पण आज शेवटचं लेक्चर आहे! शिवाय टाईम टेबल पण लागणार आहे!

यामिनी : नाही! मला दुसर फार महत्त्वाचं काम आहे! तू निघ!

*(एवढ्यात रश्मीच्या पुस्तकातून एक पाकीट खाली पडते व ती ते तत्परतेने उचलते तेव्हा यामिनी तिला हसते)*

काय ग साधे पत्र सांभाळता येत नाही! तर उद्या नवरा कसा सांभाळणार? नाही तर असाच हरवून जाईल ग!

रश्मी : नाही! मी त्याला असा गळयात बांधून ठेवीन! *(गळ्यातला ताईत हातात धरून दाखवते)*

*(लाजून निघून जाते-यामिनी कपडे, बदलायला आत जात असता लाईट कमी कमी होत जाते व पडदा पडतो)* (पहिला प्रवेश समाप्त)

## (प्रवेश दुसरा)

*(वेळ, सकाळची आठ नऊ वाजले आहेत. आज यामिनी फारच अस्वस्थ आहे. पुस्तक अस्ताव्यस्त पडली आहेत. यामिनीचा आज मूड ठीक नाही. सारखी येरझाऱ्या मारीत आहे. एवढ्यात दरवाज्यावर टकटक होते. यामिनीनीला वाटते पोस्टमन आला. तिचा चेहरा खुलतो. पण दरवाजावर शुभांगी आली आहे. तेव्हा ती नाखुशीने दरवाजा उघडते. )*

शुभांगी : अगं ये! यामिनी दरवाजा उघड!

यामिनी : थांब ह! उघडते! *(दार उघडते शुभांगी आत येते)*
काय ग! सकाळीच काय काम काढलंस?

शुभांगी : काय असणार! अगं तू टाईम टेबल आणायला सांगितले होते ना?

यामिनी : हो मी विसरलेच ग! रश्मीला पण मी बोलले होते!
अगं आपले नंबर लागले का?

शुभांगी : नाही! आज फक्त टाईम टेबल लागलं! आपली परीक्षा 16 तारखेपासून आहे .

यामिनी : आणि आज तर 12 तारीख!

शुभांगी : हो! फक्त चार दिवस राहिले परीक्षेला! अभ्यास झाला का?

यामिनी : नाही! गेल्या आठ दिवसात काही अभ्यास झाला नाही! शिवाय माझी तब्येत पण ठीक नाही!

शुभांगी : शिवाय तू गेले आठ दिवस लेक्चर पण अटेंड केले नाहीस.

यामिनी : अगं रश्मीने नोट्स आणल्या असतील.

शुभांगी : नोट्स, अगं साऱ्या होस्टेलमधली एकही मुलगी, अर्थात मी सोडून कॉलेजमध्ये दिसली नाही.

यामिनी : हे कसं शक्य आहे! रश्मी तर मला म्हणाली मी कॉलेजला जाते म्हणून!

शुभांगी : छे! शक्यच नाही!

यामिनी : मग साऱ्या जातात तरी कुठे?

शुभांगी : काय माहिती? अच्छा ते जाऊ दे! तुला टाईम टेबल मी आणले ते देऊन जाते.

यामिनी : थँक्स! उद्या मी जाऊन सीटिंग अरेंजमेंट बघून येईन .

शुभांगी : अच्छा येते मी! अगं मला खूप काम आहे!

यामिनी : बाय! बाय!! *(शुभांगी जाते) (यामिनी मासिक चाळीत बसते.)*

*(यामिनी खूपच अस्वस्थ आहे. ती पोस्टमनची - पत्राची वाट पाहत आहे. परत उठून फेऱ्या मारते. आत बाहेर करीत आहे. बाहेर येऊन अस्वस्थपणे आत येते व सुन्नपणे डोकं धरून बसते एवढ्यात पोस्टमन आल्याची चाहूल - पोस्टमन! पत्र! म्हणत पत्र आत पडते. एवढ्यात रश्मी आत प्रवेश करते. व पत्र आल्याचे पाहून ती तशीच आपलं पत्र पाहण्यास त्या रूम मधून बाहेर पडते.)*

रश्मी : येते ग! माझे पत्र आले काय बघते! *(म्हणत तिच्या रूम मध्ये जाते.)*

*(यामिनी पत्र फोडून वाचते. तिच्या चेहरा आनंदाने फुलतो. ताबडतोब जाऊन दरवाजा बंद करते व निवांतपणे पत्र वाचते, फोटो पाहते परत उठून आनंदाने फोटो हातात घेऊन गाणी गुणगुणते. आता ती खुशीत आहे.)*

यामिनी : अहा! हा! पत्र! *(आनंदाने)* पाहूया तरी कोणाचे आहे ते? *(पत्र फोडते) (आनंदाने गिरक्या मारते)* अगं बाई! किती छान आहे यांचा फोटो आपल्याला तर एकदम पसंत! काय हे राजस रूप! अहा! म्हणजे मी एकदाची यांना पसंत आले म्हणायची किती भाग्यवान मी गाणे गुणगुणते! *(फोटो घेऊन पहात गाणे म्हणते)*

हे रूप पियाचे
मनात माझ्या भरले
साजना तुम्हाला
मनोमनी मी वरले ||
स्वप्नात धुंद प्रेमात
तुम्हास कवठाळीले
साजना तुम्हाला
मनोमनी मी वरले ||

यामिनी : *(स्वगत)* किती धन्य झाले मी आज! मृगजळ समजून पुढे पुढे जाणाऱ्या हरिणीला खरोखरच पाण्याचा स्पर्श व्हावा आणि आनंदाला उधान यावं तशी आज माझी अवस्था झाली आहे! एकदाची मी त्या

म्हाताऱ्या बिजवराच्या तावडीतून सुटले! परमेश्वरा तूच रे मला वाचवलस या बुढयाच्या पाशातून! *(स्वप्न रंगविण्याचा आभास)* आज माझे याने किती जीवन सर्वस्वी बदलून जाईल . मी खूप खूप प्रेम करीन यांच्यावर! माझे स्त्रीत्व मी पणाला लावून यांना सुखी करण्यासाठी माझ्या जीवाचं रान करीन. आता सारी सुखे माझ्या पायाशी लोळण घेतील, गाडी, बंगला, पैसा याची काहीच कमी नसणार! आता परत त्या गरिबी कडे पाहणे नाही! *(परत परत ते पत्र पाहते)* आता हे रश्मीला दाखवू का! पण नाही! हे माझे गुपित गुपितच राहायला हवंय! अगदी शेवटपर्यंत!! *(फोटो व पाकीट मागे लपवते.)* एवढ्या दरवाज्यातून रश्मी आत येते. *(दरवाजा धाडकन उघडून.)*

रश्मी : अगं यामिनी! प्रथम हे पहा! अगं मला यांनी पसंत केली!

यामिनी : पसंत केली!

रश्मी : हो! बघ त्यांचा फोटो! बघ कसा राजबिंडा आहे की नाही! छान आहेत की नाही! बोल! मला तर हे एकदम पसंत आहेत यांना कुठे ठेवू आणि कुठे नाही असं झाले आहे! *(गिरक्या घेत फोटो हातात घेऊन) तरी यामिनीनी मात्र गालातल्या गालात स्मित करीत हसत आहे.)* आज मी किती किती आनंदात आहे म्हणून सांगू ....... यामिनी! अगं आमच्या बघण्याचा म्हणजे फक्त फॉर्मॅलिटी ग ..... कार्यक्रम 16 तारखेला आहे, सकाळी दहा वाजता! बोल आहे की नाही नवल! आंधळा मागतो एक डोळा देव देतो एकदम चार डोळे! आहे की नाही गंमत! आणि लग्न आहे 17 तारखेला!

यामिनी : आणि हनिमून 18 ला! असंच की नाही!!

रश्मी : चूप! चावट कुठली! *(रश्मी यामिला मिठी मारते)* यामिनी! यामिनी! आज मी एकदम खुश आहे ग, पण तू गप्प का आज नेहमी सारखी तू वाटत नाहीस!!

यामिनी : कुठे काय? काही नाही!!

रश्मी : अगं माझ्यापासून तू काहीतरी लपवून ठेवलयस!

यामिनी : तुझ्यापासून! आणि लपवणे! काय शक्य आहे का?

रश्मी : तसं नाही ग! पण काय ते सांग ना!

यामिनी : खरच सांगते अगं तसे काही नाही! माझे सगळे व्यवहार नेहमी सारखे चालू आहेत! अभ्यास परीक्षेची तयारी इत्यादी

रश्मी : ते दिसतेच आहे! *(पुस्तक अस्ताव्यस्त पाहून)* ये यामिनी! पण आमच्या बघण्याचा कार्यक्रम सोळा तारखेलाच आहे ग! आणि तेव्हा साडेदहा वाजता! म्हणजे परीक्षेचं कसं होणार ग? त्या दिवशी तर आपला पहिला पेपर आहे हे वर्ष आपलं शेवटचं आहे! या आनंदाच्या क्षणी देखील परीक्षेच्या काळजीने माझी फारच पंचायत झालेय!

यामिनी : अगं पण दोन्ही शक्य आहे का?

रश्मी : नाही ग!

यामिनी : मग!

रश्मी : ते काही असो! आता प्रथम लग्न आणि नंतर परीक्षा! अगं परीक्षेला ऑक्टोबरला बसता येईल ग! पण हा चान्स गेला तर, परत येईल असं वाटत नाही! तेव्हा

यामिनी : पहिलं लगीन आपले!

आणि मग परीक्षेचे!

रश्मी : आपलं नाही माझे! माझे!

यामिनी : हा ग बाई! तुझेच! ए रश्मी मला लग्नाला बोलाव हा, नाहीतर विसरून जाशील मैत्रिणीला! तुझी मी जीवश्यकंठश्य मैत्रीण आहे. खरं की नाही?

रश्मी : हो ग बाई! कशी विसरेन! *(अगदी हवेत तरंगते अशी करते)* अगं! जमल्यास त्याच मंडपात तुझेही लग्न लावीन! *(दोघीही हसतात.)*

यामिनी! आज मला थोडे खरेदीला जायचंय ग! एक-दोन चांगल्या साड्या घेईन म्हणते! ह्या अवतारात काय उभी राहणार त्यांच्यासमोर? खरं की नाही! येणार का तू माझ्याबरोबर?

यामिनी : नाही ग! आज खूप काम आहे! हे बघ सारे कसे अस्ताव्यस्त पडलेय! आपण असं करूया का? एक अर्ध्या तासाने निघूया! मला पण एक साडी घ्यायची आहे बऱ्यापैकी! तू असं का करत नाहीस .

रश्मी : कसे!

यामिनी : तू तयारच होऊन ये! तेवढ्यात मी आवरते! *(त्या उठतात एवढ्यात)* *(एवढ्यात कुंदन आत येते.)*

कुंदन : अरे वा! आज तुम्ही दोघी फारच खुशीत दिसताय! अभ्यास झाला का?

रश्मी : अभ्यासाच आणि आम्हाला विचारतेस *(दोघी हसतात यामिनी आणि रश्मी)*

कुंदन : हो कारण, तुम्ही कुठेतरी बाहेर जायच्या तयारीत आहात म्हणून विचारले!

रश्मी : अगं आज खरेदीला जातोय!

कुंदन : खरेदीला! कसल्या ग!

रश्मी : साड्यांच्या!!

कुंदन : अगं परीक्षा संपल्यावर कुठे जाणार आहात? एक एक मिनिट महत्त्वाचा आहे! दोन दिवस परीक्षेला राहिलेत. *( कॅलेंडरकडे पहात)* आणि तुम्ही चक्क खरेदीला चाललाय! हे काय फॅड तुमच्या डोक्यात घुसलय! आणि यामिनी तू पण! हीच ठीक आहे ग! पण तू ही हिच्याबरोबर. अगं तू एक स्कॉलर आहेस!

रश्मी : अगं बोहोल्यावर चढायच आहे मला! परीक्षेचं काय घेऊन बसलेयस!

कुंदन : चावटपणा करू नको हा!

रश्मी : खर! खर! सांगते तुला कुंदन बोहल्यावर चढणार आहे मी लवकरच! खरोखर विश्वासच बसत नाही माझा!

कुंदन : वेड बिड लागलं नाही ना?

रश्मी : वेड तर खरच लागलेय! पण लग्नाचं!!

कुंदन : तुमचं बाई सार काही विचित्रच अं! *(अगं परीक्षेची तारीख 16 आहे.)*

रश्मी : *16 (रश्मी पार गळून जाते कारण तिला सोळा तारखेलाच बोलावलेले असते)* हो!

कुंदन : का ग! एवढं चमकायला काय झालं! तारीख ऐकून!

रश्मी : काही नाही! काही नाही!

कुंदन : येते ग! *(कुंदन उठते)* मला आता लायब्ररीत जायचं आहे! अगं यामिनी! *(कुंदन उठून जाते)* मी टाईम टेबल आणले तुला हवं होतं ना?

यामिनी : हो! पण मला सकाळी शुभांगीने दिलय!

कुंदन : अच्छा येते! *(जाते)* (

*(कुंदन जाताच....)*

रश्मी : अगं यामिनी! मी आता निघून येते! तू तयार रहा!

यामिनी : ठीक! ये!

यामिनी *(स्वगत)* : बरे झाले या गेल्या त्या! आलेले पत्र पण मला धड वाचता आले नाही! आता जरा निवांतपणे वाचूया! *(कोचावर बसून वाचते वाचण्याचा अविर्भाव करते आणि उठून उभी राहते.)* अगं बाई! सोळा तारीख! *(परत परत वाचते खाली बसते)* आणि परीक्षा पण 16 तारखेलाच आहे! म्हणजे परीक्षा बुडवावी लागणार? आता काय करणार! आपल्याला तर परीक्षा पास व्हायलाच हवेय! *(आता*

*तिची मनस्थिती दोलायमान झाली आहे. परत उठून उभी राहते येरझाऱ्या मारते.)* काही कळत नाही! रश्मी! अगं बाई रश्मीला पण सोळा तारखेलाच बोलावलंय! ती आत्ताच म्हणत होती नाही का? तिने तर परीक्षेला न जाण्याचा ठरवलंय! ही अपॉइंटमेंट परीक्षानंतर आली असती तर काय झालं असतं! अगोदर जाऊन त्यांना भेटावे का? नको! तसं करणं म्हणजे आगाऊपणा होईल! त्यापेक्षा ..... त्यापेक्षा परीक्षेलाच बसायचं नाही! नाहीतरी आता मी यांना पसंत पडले आहेच! एकदाच ठरवून टाकूया! लग्नाचा बार पहिला वाजवायचा! परीक्षेचा नंतर बघू! ठीक आहे! आता येईल रश्मी! मी तर विसरुनच गेले होते! आता निघायला हवंय! *(एवढ्यात रश्मी येते यामिनी ते पत्र तेथेच टेबलवर ठेवून आत जाण्यास निघते)*

रश्मी : अगं तू अजून तयार नाहीस! काय करत होतीस एवढा वेळ?

यामिनी : काही नाही ग! आवरा आवर करीत होते!

रश्मी : चल! चल! लवकर निघ!

यामिनी : तू जरा बस बघू! मी आत्ता निघून येते. *(कपडे बदलायला आतल्या रूम मध्ये जाते रश्मी तिच्या (यामिनीच्या) टेबलावर पुस्तके इकडे तिकडे चाळते तेव्हा तिला 'ते' यामिनीचे पत्र मिळते ती कुतूहलाने घेऊन वाचते. तिचे चेहऱ्यावरचे भाव मिनिटा मिनिटाला बदलतात. तिला आश्चर्य वाटते.*

*यामिने आपल्यापासून हे सारे का लपून ठेवले? यामिनी येईल या भीतीने आत वाकून बघते परत वाचते- परत पाहते.)*

रश्मी : *(स्वगत)* अय्या! आश्चर्य! अरे हिने पण माझ्यासारखंच ॲडला अप्लाय केला तर! किती लबाड ग ही! या कानाचं त्या कानाला कळू दिलं नाही! मी एवढी जीवाची मैत्रीण पण माझ्यापासूनही हिने लपवून ठेवलं! अरे हिला ही 16 तारखेलाच बोलावलंय काय आश्चर्य! आणि हा फोटो पण छान आहे! लकी गर्ल!

*(एवढ्यात आतून यामिनी येते असा आवाज होतो ती रश्मीला हाक मारते)*

यामिनी : रश्मी! आले हं! *(येते)* सॉरी ह! तुला एकटीला बसावे लागले!

रश्मी : नाही ग! मी मॅक्झिन वाचत बसले होते. वेळ कसा गेला कळलच नाही! बरं निघायचे ना?

यामिनी : हो! *(निघतात)*

रश्मी : यामिनी! आज तू फारच खुशीत दिसतेस ग! काही विशेष!

यामिनी : काही नाही ग! नेहमीचच!! चल लवकर जाऊया. आल्यावर आज खूपच कामे आहेत.

रश्मी : कुठे जायचं! दादरला जाऊया! साडी सेंटरला!

यामिनी : चल! जातात *(पडदा पडतो अंधार होत जातो.)*

## (प्रवेश तिसरा)

स्थळ :- जागा एका विवाह मंडळाची ज्याचे नाव "विश्वासू" विवाहेच्छु मंडळ आहे. हॉलमध्ये कुंदन, रेवती बसल्या आहेत व त्यांच्या व्यतिरिक्त इतर तीन-चार मुली बसल्या आहेत. त्या मासिके वाचित आहेत. संचालिका अधून मधून फेऱ्या मारीत आहे व त्यांची प्यून गंगु आत बाहेर करीत आहे. येणाऱ्यांची व्यवस्था लावीत आहे. घड्याळात दहा पंचेचाळीस झाले आहेत. रश्मीची फारच घालमेल होत आहे एवढ्यात रश्मी येते व कुंदन शेजारी बसते.) रश्मी परत उठते व संचालिका आत असते तिला हाका मारून बाहेर बोलवते.)

संचालिका : स्वागत! आपले स्वागत आमचे विश्वासू विवाहेच्छु मंडळ करीत आहे! ही संस्था आम्ही नव्याने चालू केली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात रिस्पॉन्स मिळेल असे वाटले नाही. आपली, पर्यायाने समाजाची सेवा करण्याची आपण आम्हाला संधी दिलीत आम्ही आपले ऋणी आहोत! आमच्या संस्थेत मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुषांची व ती अत्यंत उच्च व सुशिक्षित सधन अशा स्थळांची नोंद आहे. आपले संसार सुखाचे होवोत! आम्ही *(बोर्डाकडे बोट दाखवून)* आमच्या नावाप्रमाणे विश्वासाला पात्र आहोत. त्यासाठी आजही आमची पाठ थोपटून घेतो! शांत बसा!

रश्मी : *(उठून)* नमस्कार! माझं नाव रश्मी! रश्मी विश्वासराव!

संचालिका : छान! बोला!

रश्मी : मॅडम किती वाजता प्रत्यक्ष बघण्याचा कार्यक्रम सुरू होईल?

संचालिका : बरोबर ११ वाजता!

रश्मी : अहो पण! आम्हां महिलांव्यतिरिक्त इथे कसे कोणी नाही? म्हणजे, माझ्या म्हणण्याचा उद्देश तुमच्या ध्यानी आला का?

संचालिका : नाही!

रश्मी : अहो पुरुष मंडळी!

संचालिका : हा! हा! हे पहा *(बोट बोर्डाकिडे दाखवते)* इथे फक्त स्त्रियांसाठीच बसण्याची व्यवस्था आहे! पुरुषांची व्यवस्था वेगळी!

रश्मी : समजले! म्हणजे ते तिकडे आले असणार!

संचालिका : हो! त्यांची व्यवस्था आमच्या या कॉम्प्लेक्स मध्ये करण्यात येणार आहे! तुम्ही सगळयांनी आपापली नावे आमच्या या रजिस्टरमध्ये नोंदवा! सह्या करा. व आपल्या पत्राचा सिरीयल नंबर तसेच आपला ईमेल आयडी पुढे टाका! म्हणजे आम्हाला पुढे संपर्क करणे सोपे जाईल! आज हजर आहेत त्यांनाच संपर्क करण्यात येईल! पहा! जशी तुम्हाला पत्र पाठवली तशीच पत्रे तुमच्या वर मंडळींना पाठवली आहेत! ते आलेच असणार आमच्या कोऑर्डिनेशन डिपार्टमेंट मध्ये! *(रश्मी सारखी घड्याळ कडे पाहते)*

रश्मी : अच्छा! तिकडे! *(बोटाने दाखवून हात मागे करते.)*

संचालिका : अहो! रश्मी बाई! आपण एवढ्या बेचैन का? सारख्या घड्याळाकडे पाहता! तुम्हाला कुठे अर्जंट जायचं आहे का?

रश्मी : नाही! नाही!! काही नाही! मी मी याच कामासाठी आले आहे! *(पॉकेट मधून फोटो काढून परत परत पाहते)*

संचालिका : अच्छा, तुम्ही बसा! मी दोन मिनिटात कॅम्पस मध्ये जाऊन येते! अगं ये गंगू!

गंगू : जी बाईसाहेब!

संचालिका : इथे त्यांना नीट बसव! काय हवं नको ते पहा! मी येते!

गंगू : होय! बाईसाहेब! *(ती बाहेर जाऊन कोण कोण येत आहे का पाहते. आतून आणखी मासिके आणून देते. थोडा वेळ शांतता)*

रश्मी : अगं! कुंदन!

कुंदन : काय ग?

रश्मी : तुला तर मी पाहिलेच नाही! काय ग? आज तू कशी काय इथे?

कुंदन : आ! काही नाही सहज!

रश्मी : सहज!

कुंदन : *(बावरल्यासारखी करित)* अगं माझ्या भावाचे प्रपोजल यांच्याकडे दिलंय त्याची चौकशी करायला आले!

रश्मी : अच्छा! भावाचे का? तुझे तर नाही ना?

कुंदन : नाही! नाही! काहीतरीच तुझं!

रश्मी : खरंच का?

कुंदन : खरंच ग! त्याचा मी अजून विचारच केला नाही!

रश्मी : आय सी! आणि परीक्षेला का गेली नाहीस?

कुंदन : मी ड्रॉप घेतलाय!

रश्मी : ड्रॉप! अगं कालपर्यंत तुझं परीक्षेला बसायचं नक्की होते ना?

कुंदन : हो! पण, जाऊ दे ग! ऑक्टोबरला बसता येईल *(एवढ्यात गंगू कुंदनचे नाव पुकारते)*

गंगू : कुंदन देशपांडे!

कुंदन : हा मी आले! मला बोलावलंय का?

गंगू : हो! बाईसाहेबानी बोलावलंय!

कुंदन : येते ग! रश्मी! *(जाते)*

*(एवढ्यात रेवती आत प्रवेश करते)*

*(इकडे तिकडे पहात रेवती प्रवेश करते. आश्चर्याने)*

रेवती : हॅलो! रश्मी अगं तू इथे कशी काय? आज परीक्षा ना?

रश्मी : थोडं काम आहे ह्यांच्याकडे!

रेवती : काय बरं?

रश्मी : पर्सनल! सिक्रेट!!

रेवती : आय सी पर्सनल! आणि सिक्रेट! म्हणजे माझ्यासारखंच!

रश्मी : आणि तू ग!

रेवती : आमच्या लग्नाचा रजिस्ट्रेशनचे फॉर्म यांच्याकडून घेऊन जायचे आहेत. शिवाय आमच्या लग्नाची डेट आज ठरवायची आहे. आम्हाला वैदिक पद्धतीने लग्न करायचे आहे.

रश्मी : कधी!

रेवती : बहुतेक उद्या संध्याकाळी पाच वाजताच्या गोरज मुहूर्तावर! आमची सारी तयारी झाली आहे.

रश्मी : उद्याच! एवढया लवकर! झटपट! सो लकी!!

रेवती : हा झटपट! आज जेवढं लवकर होईल तेवढं बरं असं वाटायला लागलंय!

रश्मी : रेवती! अगं तुझे मिस्टर आले नाही ते?

रेवती : ते बाहेर उभे आहेत!

रश्मी : बाहेर!

रेवती : हो! कारण त्यांना इथे प्रवेश नाही!

रश्मी : ते खरंच ग! पण तू आम्हाला त्यांचा फोटो वगैरे कधी दाखवलास नाही! आहे का तुझ्याकडे!

रेवती : नाही ग! पण माझ त्यांच्यावर फार प्रेम आहे! आणि माझ्यावर त्यांचे!

रश्मी : प्रेमाचं ठिक आहे ग! पण सारी चौकशी नको का करायला?

रेवती : काय गरज आहे! उद्यातर लग्न होणार!

*(एवढ्यात यामिनी आत प्रवेश करते ती रश्मीला पाहते व ताबडतोब बाहेर जाते परत वाकून आत बघते परत बाहेर जाते)*

*(एवढ्यात गंगू रेवतीचे नाव पुकारते.)*

गंगू : रेवती बाई!

रेवती : आले हा! *(जाते)*

*(एवढ्यात यामिनी परत प्रवेश करते यामिनीची नजरा नजर होते पण या मी परत रश्मीकडे बघत नाही, पाहिलं ना पाहिल्या सारखे करते व मासिक वाचत बसते जसं काही झालं नाही.)*

*(रश्मी आम्ही जवळ जाऊन तिला हलवते.)*

रश्मी : *(तिला राहावत नाही)* अगं यामिनी?

यामिनी : काय ग? *(रश्मी तिच्याजवळ जाऊन बसते)*

रश्मी : सॉरी! मी तुला पाहिलंच नाही ग! तू आणि इथे?

यामिनी : हो!

रश्मी : आणि परीक्षा?

यामिनी : डुबली!

रश्मी : डुबली की डुबवलीस!

यामिनी : डुबवली!

रश्मी : पण का?

यामिनी : काही नाही सहज!

रश्मी : सहज आणि तू इथे कशी?

यामिनी : सहज आले. माझे पर्सनल काम आहे. *(ती रश्मीच्या नजरेला नजर देत नाही.)*

रश्मी : यामी! तू कोणाला फसवतेस? मला काही माहित नाही असं तुला वाटतेय का? तुला इथे कोणी आणि कशासाठी बोलावलंय हे मला माहिती आहे तू लपवण्याचा प्रयत्न केलास तरी ते शक्य नाही!

यामिनी : सॉरी! मुद्दाम सांगितलं नाही! म्हणजे मला सांगण्याची हिंमतच झाली नाही! मी खरंतर त्या मनस्थितीत नव्हते समजले!

*(एवढ्यात गंगू रश्मीच्या नावाचा पुकार करते व ती जाते)*

गंगू : रश्मी बाई

*(हा आले मला बोलावलंय का)*

रश्मी : हो! आनंदाने फोटो बघत बघत जाते

*(आता तेथे यामिनीनी एकटीच राहते. ती आपले पॉकेट काढून पाहते त्यातील फोटो काढून पाहते आत वाचून पाहते.)*

यामिनी : *(स्वगत)* हे लोक केव्हा बोलवणार मला? घड्याळ पाहते केव्हा एकदाची त्यांना भेटते असं झाले मला! आज मी किती खुशीत आहे म्हणून सांगू! परमेश्वरा एकदाचे माझे मनोगत पुरे होऊ दे, आमचे लग्न करूनच माझ्या आई वडिलांना भेटायला जाऊ! अगदी सरप्राईज देऊ!

*(एवढ्यात यामिनीनीच्या नावाचा पुकार होतो)*

गंगू : यामिनी!

यामिनी : आले! *(लगबगीने आपली बॅग उचलून चालू पडते)*

*(आता थोडा वेळ काळोख पडेल व हा सीन बदलून यानंतर हॉस्टेल रूमचा सीन येतो.)*

**प्रवेश ३** : *(वेळ सकाळची आहे साडेनऊ वाजताची.)*

*होस्टेल रूमवर यामिनी आपले केस पुसत इकडे तिकडे येर झाल्या मारीत आहे आज ती फारच अस्वस्थ आहे.)*

यामिनी : *(स्वगत)* मला त्या संचालक बाईंनी असं का सांगावं? माझी मुलाखत ठरूनही हे का आले नाहीत? असं कसे झाले? *(तिला रडू कोसळते त्यातून सावरून)* त्यांना असा अचानक काय काम निघालं असणार? बरं त्यांचा पत्ता माझ्याकडे नाही! माझा तरी त्यांच्याकडे असेल का? हा काय प्रकार आहे? माझा तर जीव अगं दी पार घाबरून टांगणीला लागला आहे! आजचा दिवसही असाच गेला, ते मला का भेटायला आले नाहीत? त्या बाईंच्या म्हणण्याप्रमाणे मला दोन दिवसात ते भेटतील असं वाटत होतं पण ती वेळही टळून गेली. मी तर त्यांना भेटण्यास केवढी उत्सुक आहे! गेले दोन दिवस मला जेवणही गेले नाही! आता काहीच सुचत नाही! या चक्कर मध्ये माझी परीक्षा डुबली. सारे वर्ष फुकट गेले, या सगळ्याचा विचका झाला तर? तोंड दाखवायला ही जागा राहणार नाही! काय पुढे वाढून ठेवले परमेश्वरच जाणे! शेवटी

काय? नशीबात असेल तसंच घडेल म्हणा! हे परमेश्वरा मी सर्वस्वी परावलंबी आहे! *(एवढ्यात दरवाजा धाडकन उघडून रेवती धडपडत येते.)*

रेवती : यामिनी! बरबाद झाले ग मी! *(रडायला सुरुवात करते.)*

यामिनी : अगं, पण काय झाले, ते तर सांगशील?

रेवती : मी पार लुटले गेले ग! *(ती रडत असता यामिनीनी तिला समजावते.)*

यामिनी : अगं पण काय झाले ते सांगशील की नाही?

रेवती : काय सांगणार? *(हुंदका देत)* अगं माझ्या लग्नाचा विचका झाला? दागिने कपडे सारे सारे चोरीला गेलं आणि *(हुंदका देत रडते)* मेल्याने माझं सर्वस्वही लुटलं ग! बरबाद झाले मी! यामिनी अगं तोंड दाखवायला जागा नाही मला! *(तिला चक्कर येते व ती खाली कोसळते - यामिनी तिला सावरते तेवढ्यात रश्मी आत येते.)*

रश्मी : अगं! अगं! काय झालं हिला? *(तिला सावरण्यास मदत करते.)*

यामिनी : काय सांगणार! बिचारी बरबाद झाली! लग्नाच्या सापळ्यात!!

रश्मी : काय? *(जोरात ओरडते)* काय सांगतेस काय?

यामिनी : हो!

रश्मी : त्याने हिला फसवले! तशी तिला मी सावध केली होती! अगं तो काय करतोय याचीही साधी चौकशी हिने करू नये?

यामिनी : त्या भामट्याने तिला पार लुटलं! अगदी सुशिक्षित असून अशी फसवली जावी आश्चर्य आहे! मग अडाण्यांची काय कथा? *(रेवतीला थोडा वेळ कोचावर झोपवतात)* ती कोचावर उठून बसते.

रश्मी : होय ग! मला तर आता फारच भीती वाटायला लागली आहे!

यामिनी : काय झालं?

रश्मी : तसं काही नाही!

यामिनी : तसं काही नाही म्हणजे?

रश्मी : अगं ते भेटले नाहीत. म्हणे आलेच नाहीत! काही महत्त्वाच्या कामामुळे त्यांना वेळ नाही!

यामिनी : वेळ नाही! आश्चर्य! का यांनाही काम निघालं आणि तेही आजच!

रश्मी : काहीतरी गडबड घोटाळा वाटतोय मला .

यामिनी : नसेल गं! असं घडू शकते! शेवटी ती मोठी माणसं! एवढा गाडा ओढायचा कारभाराचा म्हणजे शक्य नाही का?

रश्मी : काय बा?

*(एवढ्यात रेवती उठून बसते तिला पाणी हवंय.)*

रश्मी : अगं यामिनी हिला पाणी हवंय! जरा दे ना!

यामिनी : हो! *(पाणी आणण्यास आत जाते.)*

रश्मी कसं वाटतंय तुला आता?

रेवती : काय वाटायचं! खरंच वेड लागेल असं वाटतंय मला!

रश्मी : पोलिसात कळवूया चल! त्या भामट्याला पकडायला हवेय!

रेवती : कशाला? त्यांनी का माझं लुटलं गेलेलं सर्वस्व परत मिळणार आहे?

रश्मी : नाही पण मेल्याना अद्दल तर घडविता येईल ना अशा तऱ्हेचे हे बदमाशी करणार नाही, त्याला तरी आळा बसेल!

रेवती : नको! माझी नाचक्की होईल! पुढचं जीवन कसं जगायचं मग?

रश्मी : मग कोणी सांगितले होते एवढे थेर करायला? गळ्यात गळा घातलात! आता रड! एवढा उतावीळ कशाला व्हायला हवे होते! निघाली बोहल्यावर चढायला!

यामिनी : *(पाणी घेऊन येते व रेवतीला देते)* अगं! तू काय कमी आहेस?

रश्मी : आणि तू?

यामिनी : आपण साऱ्या त्यातल्याच ग! मार निघालो बोलल्यावर चढायला!! चक्क गुडघ्याला बाशिंग बांधून!

रश्मी : खरंच ग! अगं पण तुझं? त्या कॉल च काय झालं?

यामिनी : काय होणार! म्हणे आज ते आले नाही! तुम्हाला ते प्रत्यक्ष भेटतील. त्यापूर्वी पत्राने कळवतील! आता आमचा संबंध संपला अशी ती संचालिका म्हणाली!

रश्मी : काय? मलाही तेच सांगितले!!

यामिनी : तुलाही तेच?

रश्मी : हो याचा अर्थ काय समजायचा?

यामिनी : सावध व्हायला हवंय! नाहीतर आपली रेवती व्हायची!

*(एवढ्यात बाहेर मुलींचा गलबला चालला आहे व पोस्टमन आल्याचा आवाज पोस्टमन! पत्र! एवढ्यात यामिनीच्या रूममध्ये पत्र पडते - यामिनी पत्र उचलण्यास वाकते .)*

रश्मी : अगं यामिनी! मला वाटतं माझ्याही रूममध्ये पत्र पडल असणार! जरा येते हा!

*(सगळ्याजणी आपआपल्या रूममध्ये जातात. त्यांना आलेली पत्रे फोडतात, आणि वाचताच त्या सगळ्या बाहेर येतात...*

*रश्मी आपल्या रुममधून बाहेर येते तर मोठा गोंधळ सुरू असतो. रश्मी आपले पत्र घेऊन बाहेर येते.)*

रश्मी : काय ग कसला गोंधळ हा, का उगाच सगळ्या बोंबलताय! *(रश्मी आपले पत्र वाचते)*

मुली : हे बघ रश्मी आम्ही सगळ्या फसवलो गेलोय. तोंड दाखवायला आता जागा नाही. परीक्षा डुबली. एक वर्ष वाया गेले. ते गेलो आणि आता हे हॉस्टेल सोडावे लागणार आहे! जायचे कोठे? घरचे लोक काय म्हणतील?

रश्मी : अगं यामिनी! मीही मूर्ख बनले ग! आणि तूही फसलीस ना ग यात?

यामिनी : हो! मीही फसले. आता पदवीचा घोळ निस्तरावा लागणार आणि त्या म्हाताऱ्याच धोंडही गळयात बांधून घ्यावी लागणार! *(आणि तिला भडभडून आले.)*

रश्मी : आणि ती रेवती तर या चक्रात बरबाद झाली. शरीरही देऊन मोकळी झाली... नालायक! आता हे बरबटलेले शरीर कोण ग जवळ करील?

रश्मी : खर आहे. त्यापेक्षा आपण बऱ्या! कुठे आहे ती रेवती? अगं रेवती?

रेवती : बोल! अगं तुम्ही थोडक्यात वाचलात. मी तर पार बरबाद झाले. पण आता मी गप्प बसणार नाही. जाते पोलीस ठाण्यात!

रश्मी : थांब! मी पण येते! या बदमाशाना धडा शिकवायलाच हवा! तरच मनाला शांती मिळेल..!

रेवती : अगं बाकीच्यांचं काय?


रश्मी : त्यांनी कच खाल्ली! म्हणे बदनाम होऊन तोंड दाखवायला जागा नाही राहणार! पण मला जावेच लागेल. मी स्वतः साऱ्या दलदलीचा पडदा फार्श करणार, मी पोलिसांना सांगणार नी त्या विवाह संस्थेलाही धडा शिकवणार! अगं हे सगळे मिली भगत आहेत! त्यांना सोड! तू चल माझ्याबरोबर. *(त्या पोलिस स्टेशनला जातात.)*


रेवती : हो!


आणि पडदा पडतो!


अॅड. यशवंत कदम
यांची ई
साहित्यवरील
इतर पुस्तके.


कव्हरवर क्लिक करताच उघडतील












## ई साहित्य प्रतिष्ठान सोळा वर्षाचे होत आहे.

## ॲड. यशवंत कदम यांचे हे ई साहित्यवरील नववे पुस्तक.

ॲड. यशवंत कदम हे इन्कमटॅक्स कमिशनर व शिक्षणाने वकील. या दोन्हीही व्यवसायांत त्यांना असंख्य मानव प्रवृत्ती पहायला मिळाल्या. इन्कम टॅक्स मधे लोक पैसे कमावतात पण यांनी अनुभव आणि मैत्री कमावली. अध्यात्मिक वृत्तीचे श्री. कदम आपले निवृत्तीनंतरचे आयुष्य आपल्या वाडवडलांच्या गावी ईश्वरसेवा आणि साहित्यसेवेसाठी व्यतीत करत आहेत. त्यांची आजवर सुमारे तीस पुस्तके विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत. त्यांच्या कथा व कादंबऱ्यांतून मानवी आयुष्यातील व्यावहारिक व अध्यात्मिक मूल्यांचा बोध होतो. त्यांच्या कथा विविध दिवाळी अंकांतून व नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा मनुष्य संग्रह व वाचक संग्रह फार मोठा आहे.

ॲड. यशवंत कदम यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद

(१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५१ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (८), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (९), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखा्नीस (4), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) असे

अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ‘इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।



लेखक

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या परिवारातील ज्येष्ठ लेखक श्री. यशवंत कदम यांनी प्रस्तावना लिहण्यासाठी त्यांचं नाट्यलेखनाचं स्क्रिप्ट माझ्या हातात ठेवलं तेव्हा एक सुखद धक्का बसला. कथात्मक साहित्यात इतकी वर्षे रमणारा हा लेखक उशीरा का होईना पण नाट्यलेखनाकडे वळला याचा आनंदही झाला. आजवर कथा, कविता, चरित्र, अभंग, संतसाहित्यावरील वैचारिक लेखन अशी जवळजवळ तीसहून अधिक पुस्तके त्यांची प्रकाशित झालेली आहेत. जबाबदारीची नोकरी सांभाळून त्यांनी आपला हात अखंड लिहिता ठेवला हे विशेष.